महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४४२, ४४३,
ई-मेल–desk2@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्र. २/ एनजीसी/इंजि./मान्यता/(१०९/२०२१)/ ९८१ दिनांकः 28 FEB 2022

प्रति,
प्राचार्य,
वैनगंगा कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड मॅनेजमेंट
डोंगरगाव, गुमगाव रेल्वेस्टेशनजवळ, पोस्ट-गुमगाव,
वर्धा रोड, नागपुर .४४१ ११४.

(डीटीई कोड -४१४५)

विषय : शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून कायम विना-अनुदान तत्त्वावर विद्यमान संस्थेत नवीन अभ्यासक्रम व सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ सुरू करण्यावावत.

संदर्भ : शासन निर्णय क. टीईएम-२०२१/प्र.क्र.१२४/तांशि ४, दि. १८.०८.२०२१

उपरोक्त विषया संदर्भात आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून कायम विनाअनुदानित तत्वावर विद्यमान संस्थेत नवीन अभ्यासक्रम व सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ खाली दर्शविलेल्या प्रवेशक्षमतेसह विहित अटींच्या अधिन राहून सुरू करण्यास परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| १. | बी.ई./बी.टेक.कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनिअरिंग | ६०-९० |
| २. | एमबीए | ६०-१८० |
| ३. | एम.ई./एम.टेक.कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनिअरिंग | १८-२४ |
| ४. | एम.ई./एम.टेक.पॉवर इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड पॉवर सिस्टीम | १८-२४ |
| ५. | बी.ई./बी.टेक.आर्टिफिशियल इंटेलिजन्स ॲण्ड डाटा सायन्स | ३०-६० |
| ६. | एम.ई./एम.टेक.कॉम्प्युटर एडेड स्ट्रक्चरल इंजिनिअरींग | ३० |
| ७. | एम.ई./एम.टेक.आर्टिफिशियल इंटेलिजन्स ॲण्ड डाटा सायन्स | १२ |

आपल्या संस्थेने शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व इतर अटी यांचे पालन करण्यावावत नोंदणीकृत हमीपत्र प्रपत्र "अ" व "ब" या संचालनालयास सादर केलेले आहे. आपल्या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून कायम विना अनुदान तत्वावर विद्यमान संस्थेत नवीन अभ्यासक्रम व सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ सुरु करण्यास नियतठेव म्हणून रु ३.०० लाख खाते क्र. ८७५६४५११०००४४८२, रु. ३.०० लाख खाते क्र. ८७५६४५११०००४४८४, रु. ३.०० लाख खाते क्र. ८७५६४५११०००४४८३ व रु. १.५० लाख खाते क्र. ८७५६४५११०००४४८५ दि. १४.९.२०२१, अन्वये

बँक ऑफ इंडिया शाखा - डोंगरगाव येथे संस्थेचे अध्यक्ष व संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात १० वर्षासाठी जमा केलेले आहेत.

संदर्भाकित शासन निर्णयात विहित केलेल्या अटी व शर्ती सह खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून कायम विना अनुदान तत्वावर वरीलप्रमाणे विद्यमान संस्थेत नवीन अभ्यासक्रम व सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ सुरु करण्यास व संबंधित विद्यापीठाची संलग्नता प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांना विहित पध्दतीने प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून परवानगी देण्यात येत आहे.

१. संचालक, किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषद, नवी दिल्ली तसेच शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.
२. संचालनालयाच्या माहिती तंत्रज्ञान कक्षाकडून दिलेल्या संकेतांक क्रमाक व पासवर्डद्वारे शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर सर्व बाबीसंबंधीची माहिती संस्था वेळोवेळी अद्ययावत करतील.
३. संस्थेने प्रवेशासाठी संबंधित पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश नियामक प्राधिकरण यांचेकडे, तसेच संबंधित पदविका अभ्यासक्रमांची तंत्र शिक्षण संचालनालय यांचेकडे नोंदणी व तद्अनुषंगिक कार्यवाही करणे आवश्यक राहील.
४. शासनाने, या संचालनालयाने, **राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.** व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषद, नवी दिल्ली यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार शासन /अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषद, नवी दिल्ली, यांना राहतील.
५. वरील अभ्यासक्रम राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांनी स्थानिक चौकशी समितीने घातलेल्या अटी पूर्ततेच्या अधिन राहून दिलेल्या मान्यतेच्या आधारे मान्यता देण्यात येत असून याबाबत काही अडचणी निर्माण झाल्यास त्यास संबंधित संस्था सर्वस्वी जबाबदार राहील.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती, शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती व वेळोवेळी शासन / संचालनालय यांनी निर्गमित केलेल्या आदेशांचे काटेकोर पालन करणे आपणास बंधनकारक राहील.

(डॉ.अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत- मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी सादर.

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित :

१. मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र शासन, ९ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायर मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१

त्यांना विनंती करण्यात येते की, प्रस्तुत संस्थेने आपल्या कार्यालयाकडे नोंदणी केल्याशिवाय प्रस्तूत अभ्यासक्रमांस प्रवेश करण्यात येऊ नयेत.

२. कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर.
४. कार्यासन क्र. २ अ मुख्य कार्यालय, मुंबई.
५. कार्यासन क्र.३ आयटी सेल, मुख्य कार्यालय, मुंबई.
६. निवड नस्तीस.

\\192.168.1.9\Desk2\Approval Process 2021-22\Final Order 2021-22\Aicte\Final Order_2021-22.Docx